**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ नोव्हेंबर २०२०.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९.**

क्रमांक एफएलआर. ०६२०/प्र.क्र. ९०/राउशु-२.—ज्याअर्थी, मुंबई विदेशी मद्य आणि शुद्ध मद्यार्क (वाहतूक शुल्क) नियम, १९५४ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून हे नियम, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, (१९४९ चा पंचवीस) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धीशिवाय तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम १४३ चे पोट-कलम (२) च्या खंड (ब), खंड (फ), खंड (ह-१) व खंड (यु) नुसार तरतूद केल्याप्रमाणे व प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, याद्वारे, महाराष्ट्र शासन, मुंबई विदेशी मद्य आणि शुद्ध मद्यार्क (वाहतूक शुल्क) नियम, १९५४ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे :—

१. या नियमांना, मुंबई विदेशी मद्य आणि शुद्ध मद्यार्क (वाहतूक शुल्क) (सुधारणा) नियम, २०२० असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई विदेशी मद्य आणि शुद्ध मद्यार्क (वाहतूक शुल्क) नियम, १९५४ मधील नियम ४ मध्ये—

(अ) उप नियम (१) च्या खंड (*a*) च्या नंतर खालील खंड समाविष्ट करण्यात येत आहे :—

"(*aa*) जेंव्हा सीमा शुल्क सरहद्दीमधून किंवा सीमा शुल्क बंधित वखारीतून मद्याची बाटल्यांमधून वाहतूक होईल,–

(*i*) स्पिरीटस् करिता रु. ३०.०० प्रति बल्क लिटर

(*ii*) किण्वीत आणि सौम्य बिअर किंवा मद्याकरिता रु. २०.०० प्रति बल्क लिटर

(*iii*) वाईनकरिता रु. १०.०० प्रति बल्क लिटर"

(ब) उप नियम (२) च्या खंड (*iii*) मध्ये,–

(*i*) उपखंड (*a*) मधील "निर्मिती मूल्याच्या १५० टक्के किंवा रु. ३३.०० प्रति बल्क लिटर" या शब्द आणि अंकाऐवजी "निर्मिती मूल्याच्या १७५ टक्के किंवा रु. ४२.०० प्रति बल्क लिटर" हे शब्द व अंक अंतर्भूत करण्यात येत आहेत ;

(*ii*) उपखंड (*b*) मधील "निर्मिती मूल्याच्या १७५ टक्के किंवा रु. ४२.०० प्रति बल्क लिटर" या शब्द आणि अंकाऐवजी "निर्मिती मूल्याच्या २३५ टक्के किंवा रु. ८०.०० प्रति बल्क लिटर" हे शब्द व अंक अंतर्भूत करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Kama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, Dated 6th November 2020

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT, 1949.

No. FLR 0620/ C.R 90/EXC-2.—Whereas the Government of Maharashtra considered that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor and Rectified Spirit (Transport Fees) Rules, 1954, should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section *(3)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses *(b), (f), (h1)* and *(u)* of sub-section *(2)* of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor and Rectified Spirit (Transport Fees) Rules, 1954, namely :—

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor and Rectified Spirit (Transport Fees) (Amendment) Rules, 2020.

2. In rule 4 of the Bombay Foreign Liquor and Rectified Spirit (Transport Fees) Rules, 1954,—

*(a)* in sub-rule *(1)*, after clause *(a)*, the following clause shall be inserted, namely :—

"*(aa)* When the liquor is transported in bottles after removal from the customs frontier or customs bond,—

*(i)* Rs. 30.00 per bulk litre for spirits,

*(ii)* Rs. 20.00 per bulk litre for fermented and mild beer or liquors,

*(iii)* Rs. 10.00 per bulk litre for Wines.";

*(b)* In sub-rule *(2),* in clause *(iii)*,—

*(i)* in sub-clause *(a),* for the figures, words and letters, "150 per cent of the manufacturing cost or Rs.33.00 per bulk litre" the figures, words and letters "175 per cent of the manufacturing cost or Rs. 42.00 per bulk litre" shall be substituted;

*(ii)* in sub-clause *(b)*, for the figures, words and letters, "175 per cent of the manufacturing cost or Rs. 42.00 per bulk litre" the figures, words and letters "235 per cent of the manufacturing cost or Rs. 80.00 per bulk litre" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.